# गांवपळण

## (मालवणी गजाल)



अमृता पांगे

# गांवपळण

## (मालवणी गजाल)

अमृता पांगे

ई साहित्य प्रतिष्ठान

# गांवपळण (gavpalan)

मालवणी गजाल

लेखिका : अमृता पांगे
Email :- pange.amruta@gmail.com
Ph : 9222946879

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com

©esahity Pratishthan® 2014

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

# थोडं गांवपळणी बद्दल

जगाच्या पाठीवर शेकडो देश आहेत आणि त्यांच्यात लाखो गांवं आहेत. या प्रत्येक देशाच्या, राज्याच्या आणि गांवोगांवच्या स्वतःच्या म्हणून काही प्रथा असतात. एका गांवच्या प्रथा दुसऱ्या गांवच्या, आणि देशातल्या लोकांना विचित्र वाटतील. पण प्रत्येक गांवाला आपल्या प्रथा फ़ार प्रिय असतात. आणि इतरांच्या मतांना न जुमानता त्या पाळल्या जातात.

कोकणातल्या काही गांवांत अशी एक प्रथा आहे : गांवपळण.

कोकणातली ही सुंदर गांवं. नितांतसुंदर समुद्रकिनारा. लाल कौलारू घरं. पन्नास एक घरांची वाडी. आणि दहावीस वाड्यांचं गांव. अशी ही गांवंच्या गावं काही दिवसासाठी रिकामी होतात. गांवातली सगळी माणसं, गुरं, कोंबड्या, शेळ्या, मेंढ्या सगळे गांवाबाहेर जातात.

या मागची भूमिका अशी आहे की आपल्या गांवातले आजवरचे सगळे पूर्वज अधून मधून एकमेकांना भॆटायला गांवात येतात. अशा वेळी गांवातल्या सगळ्या जिवंत माणसांनी, कोंबड्या गुरांसह गांवाबाहेर जाऊन या भुताखेतांसाठी गांव रिकामा करून द्यायचा असतो. मग हे सगळे पूर्वज गावात येतात. आपाआपल्या घरात रहातात. एकमेकांना भॆटतात. चार सहा दिवस मौजमजा करतात. एकमेकांची खुशाली घेतात. आणि मग आल्या पावली परत जातात.

या चार दिवसांत गांवातले हिंदू, मुसलमान ख्रिश्चन सगळे लोक गांवाबाहेर जातात. काही लोक रानात जातात. छोट्या छोट्या झोपड्या बांधून रहातात. काही एखाद्या नातेवाईकाकडे जातात. काही लोक दुसऱ्या गांवच्या घरांच्या शेजारी, अंगणात मुक्काम ठोकतात. या पुस्तकात मालवण जवळच्या आचरा गांवातल्या गांवपळणीची कथा सांगितली आहे. तशा अनेक गांवपळणी आहेत.

मालवण तालुक्यातील मसुरे - बिळवस गावाच्या गावपळणीत वेगळेपण आहे. संपूर्ण गाव त्यात सहभागी होतो. आजारी व्यक्ती, लहान मुलांना घरी राहण्यास मुभा आहे. पाच दिवस ही ‘गावपळण’ चालते. कुठल्याही घरात पाच दिवस कचरा काढला जात नाही. घरातील चुलीवर जेवण बनवले जात नाही. त्यासाठी दुसरी चूल थाटतात. विशेष म्हणजे या कालावधीत

घरच्या देवाची पूजा होत नाही. देवासमोर दिवा पेटत नाही. तसे बंधन आहे. रात्रीच्यावेळी गरजेपुरती वीज वापरली जाते. गावात, सुख, समाधान, शांती लाभावी हा या परंपरेमागचा उद्देश असल्याचे गावकरी सांगतात. गावचे ग्रामदैवत श्री देवी सातेरीची पूजाही पाच दिवस बंद ठेवली जाते. बिळवसची 'गावपळण' म्हणजे पूर्वी मसुरे गावाचीच ही 'गावपळण!' वाड्यांचा पसारा वाढल्याने बिळवस गावाने ही प्रथा सुरू ठेवली. देव दीपावलीला श्री देवी सातेरी मंदिरात गाव जमा होतो. धार्मिक विधीनंतर भात, काकडा, नारळ व दिवा ओवाळून बिळवसनजिक माळगाव - हुमरस सीमेवर ही 'खोरणी' घातली जाते. तिसऱ्या दिवशी गावपळणीस सुरुवात होते. गावभरणीच्या दिवशी 'डाळ' बसवतात. देवीला नारळ ठेवून पळण मान्य असेल तर कौल घेतला जातो. कौल दिल्यास त्याच दिवशी गाव भरतो. गावपळणीच्या दिवसांत गावातील ग्रामस्थ गुरेढोरे घेऊन माळगाव - हुमरस भागात छोट्या झोपड्या बांधून राहतात. जेवणासाठीचे साहित्य बरोबर असते. गुरेढोरे गावात गावपळण पूर्ण होईपर्यंत प्रवेश करत नाहीत. नित्य व्यवहार चालूच असतात. थंडीच्या दिवसांतही ग्रामस्थ थंडी सहन करीत ही परंपरा जोपासतात. जंगली भागात ते वास्तव्य करतात, पण देवीच्या कृपाशीर्वादामुळे त्यांच्या मनाची तयारी आधीच झालेली असते. पूर्वी एक महिना 'गावपळण' असायची. आज ती पाच दिवसांवर आली आहे. ग्रामस्थांनी उभारलेल्या छोट्या झोपड्यांत रात्रीच्यावेळी गोष्टी, गायनाचे फड रंगतात. एकमेकांच्या सुख-दु:खाच्या गोष्टी कथन करण्यासाठी शेतकऱ्यांना हीच तर एक संधी असते. ज्येष्ठांच्या गप्पांत युवकांबरोबरच छोटी मुलेही सहभागी होतात. जेवणाच्या पंगती एकत्रच बसतात. त्यामुळे एकत्रित राहण्याची परंपरा या प्रथेने जपली आहे, असे म्हणावयास हरकत नाही. गावातील रोगराई नष्ट होऊन गाव समृद्ध बनतो तो गावपळणीमुळेच अशी ग्रामस्थांची श्रद्धा आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील मुणगे गाव! या गावाचीही 'गावपळण' होते. देवीची चाकरी करणारे दर तीन वर्षांनी एकदा सहकुटुंब गावपळणीला जातात. तीन दिवस सीमेबाहेर राहिल्यानंतर चौथ्या दिवशी त्यांना गुरव, घाडी आणण्यासाठी जातात. त्यानंतर नौबत होते. पारधी कौलप्रसाद होतो. एका बाजूला समुद्र तर दुसऱ्या बाजूला डोंगर, नारळी, पोफळीच्या बागायतीमध्ये मुख्य रस्त्यावरच भगवती देवीचे मंदिर सर्वांचे लक्ष वेधून घेते. ५०० वर्षांचा इतिहास असणारी देवीची मूर्ती पश्चिमाभिमुख आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात काळ्या पाषाणात कोरलेल्या महिषासुरमर्दिनीच्या रूपातील कोरीवकाम असलेली पाषाणमूर्ती ४ फुटी आहे. प्राचीन शिल्पकलेचा तो अमूल्य ठेवाच आहे. देवालयाचे बांधकाम हेमाडपंथीय आहे. श्रीदेवी शिव यांच्या पूजेचे पाणी जमिनीखालून गोमुखाकडे उत्तरेकडे बाहेर येते. या गोमुखी

शिवस्थानामुळे देवीला सोममुखी प्रदक्षिणा घालतात. पालखीचा मार्गही तसाच असतो. पश्चिमाभिमुख असलेल्या या मंदिरात पूर्वेकडून प्रवेश केला जातो. भगवती मंदिर आवारात श्री देवी पावणाई, भावय, अनभवणी, देव गांगो, देव गिरावळ, बायची आदी श्रद्धास्थाने वैशिष्ट्यपूर्ण आहेत. मंदिरातील देवीची पूजा लिंगायत, गुरव, पाध्ये यांच्याकडून होते. देवी दर तीन वर्षांनी मुणगे, करविणेवाडी येथील पाडावे यांच्या घरी आपल्या लवाजम्यासहित माहेरवाशीण बनून राहायला येते.

वैभववाडी तालुक्यापासून १४ कि. मी. अंतरावर असलेले शिराळे गाव! येथेही 'गावपळण' होते. साधारणत: जानेवारी महिन्यांत ही गावपळण होते. गाव सुना सुना होतो. त्यांची 'गावपळण' सात दिवसांची असते. दरवर्षी पौष महिन्याच्या कडाक्याच्या थंडीत शिराळेवासीय आपल्या लवाजम्यासह गाव सोडून नजीकच्या सडुरे गावाच्या हद्दीवर वास्तव्य करतात. हा त्यांच्यासाठी 'सण' असतो. त्यांची ग्रामदेवता दौडोबा. पाटील, मानकरी कौल घेतात. त्यानंतर गुराढोरांसह, लहान मुलांसह सर्वजण घर सोडून गावाबाहेर राहतात. विशेष म्हणजे मोकाट सोडलेली गुरे या गावपळणीच्या काळात गावाकडचा रस्ता विसरतात. तेथे पायही ठेवत नाहीत. गेली ४५० वर्षे ही 'गावपळण' येथे सुरू आहे. गावपळणीचा कालावधी संपला की भोरपी समाजाचा पारंपरिक 'घोरीप' खेळ सादर होतो. त्याला तेथे 'नाडे घोरीप' म्हणतात.

गावचे गावपण बिघडू नये याची दक्षता गावकरी घेतात. गाव सोडून दुसऱ्या ठिकाणी राहणे या कल्पनेमागे गावकऱ्यांचा प्रामाणिक दृष्टिकोन आहे. गावात सुख, शांती, समाधान लाभावे, एकोप्याची भावना प्रत्येकात निर्माण व्हावी या हेतूनेच ही 'गावपळण' होते. गावातील शेतकऱ्यांसाठी ही एकप्रकारची 'टूर' म्हणावयास हरकत नाही. गावातील ग्रामदैवतांशी बांधील असणारा हा समाज तेथील चालीरीती आणि शिस्तीचे पालन करतो. त्यातूनच सुख-समृद्धी प्राप्त होतील या आशेवरच तो जगतो.

आचऱ्यापुढील सडेवाडी वायंगणी कालवल या ठिकाणीही गावपळण होते.

याच विषयावरचे आ बा परब यांचे गांवऱ्हाटीतील गावपळण हे पुस्तक उत्तम आहे.

सुनिल सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान

# गांवपळण

# मनोगत

वाचण्याचा छंद लहाणपणापासून होता. वाचता वाचता लिहिण्याचा छंद कधी जडला कळलेच नाही. आणि एक दिवस इयत्ता आठवीला असताना कृष्णकमळीच्या फुलाला अनुसरून आईने एक कथा सांगितली होती तेव्हा त्या फुलाला कुरूक्षेत्रावरील महाभारताच्या युध्दाचे स्वरूप देवून माझ्या लेखणीतून उमललेले पहिले काव्यपुष्प म्हणजेच कृष्णकमळ होय. तेव्हा आपणही काही तरी लिहू शकतो या विचाराने मन हर्षाने भरून आले.

अरबी सागराच्या तिरी हिरव्या वनराईने नटलेले,<br>
स्वच्छ आणि सुंदर असे ते आचरा पुण्यग्राम माझं साजिरे ।।

असे अरबीसागराचे सान्निध्य लाभलेले व श्री रामेश्वराच्या पदस्पर्शाने पावन झालेले माझे– आचरा गाव , शाळा, कॉलेजमध्ये स्पर्धांमधून माझ्या प्रतिभा पक्ष्याला गगन भरारी साठी एक नवी दिशा मिळत गेली. अशा तऱ्हेने माझ्या लेखनाला प्रारंभ झाला.

नंतर मराठी हिन्दी तसेच माझ्या मालवणी भाषेमध्ये काही कविता लिहिल्या. गावपळण, अंध दृष्टी, आंदण सारख्या लघुकथा चे लेखन झाले. कधी कधी एखादया विषयावर लिहायला लागलं की किती लिहू आणि किती नको असे होते. अश्यावेळी हात ही दुखतो कागद ही संपतो पण मनातील भावनांचा पूर तो मात्र कधीच ओसरत नाही.

काळाच्या ओघात काही भाषा लोप पावताना दिसत आहेत यांपैकी एक माझी मालवणी भाषा. म्हणुनच मराठी बरोबरच या भाषेमध्ये जास्तीत जास्त साहित्य निर्मिती व्हावी आणि त्याची नोंद जगाच्या इतिहासात व्हावी अशी माझी प्रामाणिक इच्छा आहे. तर रसिक हो या इच्छेला जर तुमच्यासारख्यांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला तर तो ही दिवस दूर नाही.

तर विदयादेवतेला मी एवढीच सांगेन की..........

दिव्या दिव्या अक्षर दे...<br>
*शब्दरूपी रत्नांचे मोहोर मजला दे ,*<br>
*उजेडाच्या भावार्थात*<br>
*लेखणीला माझ्या बहर दे... ।। धृ ।।*

कु.अमृता नेताजी पांगे.

# लघुकथेविषयी थोडक्यात विवरण :–

मालवण तालुक्यातील आचरा गावात माझं बालपण व्यतीत झालं. बारा वाडींनी समृद्ध असणारे हे आचरा गाव अरबी सागरी किनारपट्टी, माड–फोफळीच्या बागा, पारंपारीक व्यवसाय करणारे येथील रहिवासी, अजुनही देव–देवस्की, करणी, बळी देणे यासारख्या अंधश्रद्धांवर विश्वास ठेवणारे श्रद्धाळू लोक, श्री शिवछत्रपतीकालीन श्री देव रामेश्वर संस्थान अशा विविध भौगोलिक व सामाजिक वैशिष्ट्यांसाठी प्रसिद्ध आहे. तसेच अशाच काही आगळया वेगळया पूर्वापार प्रथाही येथे आजपावेतो चालू आहेत. त्यांपैकी एक प्रथा म्हणजेच **"गावपळण"** होय.

या प्रथेनूसार दर 5 वर्षानी येथील गावकरी (प्रमुख – घाडी, गुरव, गांवकर आदि...) या गावचे एकमेव दैवत इनामदार श्री देवरामेश्वराला कौल लावून त्याच्या आदेशानूसार 3–5 दिवसांसाठी सारे आचरेवासिय घर दार सोडून कुत्री, कोंबडी, गुरे यांना घेऊन गावाबाहेर जाऊन, वस्ती करून राहतात. माणसांनी गजबजलेले हे गाव सूनसान स्मशानासारखे भासते. संसार प्रपंचातून काही व्यक्तींना कधीच स्वतःसाठी वेळ काढता येत नाही. अशा लोकांनी 3–5दिवसांसाठी का होईना पण गावकुसाबाहेरचे जग पाहावे असा या प्रथेमागे उद्देश असावा असे मला तरी वाटते. मात्र येथील लोकांचा असा समज आहे कि गावात शांती नांदावी, इडा–पिडा टळायला हवी तर दर पाच वर्षातून एकदा आपले गाव आपल्या पूर्वजांच्या म्हणजेच भूता–खेतांच्या स्वाधीन करून आपण 3–5दिवसांसाठी गावच्या सीमेबाहेर जाऊन कोठेहि वास्तव्य करून राहायचे. पण या कालावधीत गावात मात्र कुणीच राहावयाचे नाही. आणि तरीही कुणी राहिलेच आणि काही विपरीत घडल्यास त्याला कुणीही जबाबदार नसते. कारण त्या कालावधीत स्वतः गावचा वाली देव रामेश्वर ही गावाबाहेर वास्तव्यास असतो. तसेच हि प्रथा सर्व धर्मीयांना लागू होते. यावरून येथील सर्वधर्मसहिष्णूता हि दिसून येते. आज्ञा देणारा एकमेव रामेश्वर आणि त्याच्या आज्ञेचे पालन करणारे श्रद्धाळू लोक....

तर मी इयत्ता दहावीत असताना झालेल्या संस्मरणीय अशा गावपळणीचे हे माझ्या शब्दात आणि माझ्या मालवणी भाषेत रेखाटलेले हे चित्र :–

**फणसा सारखी रसाळ मधुर अशी भाषा माझी मालवणी ,**

**घातली जरी कुणी शिवी तरी कानांना वाटे गोड ओवी!!**

अशा शहाळयासारख्या गोड मालवणी भाषेतील हि लघुकथा
एका गोड व्यक्तीला समर्पित करते

# आमचे आजोबा (देऊ पांगे)

हयात नाहित आता जरी तो घराचा कर्ता पुरूष
अजूनही वाटतो आम्हा सर्वांना तयाच्या वर्चस्वाचा धाक ।।

**कु. अमृता नेताजी पांगे.**

## गावपळण

रामेश्राक परसाद लागलो

गावपळणीचो नियेद लागलो ।। धृ ।।

कोण जातला रानावनात

तर कोण जातला सडयार ।। १ ।।

कोण जायत सासुरवाडीक

तर कोण जायत मायेराक ।। २ ।।

सामानाची बांधाबांध बेगीन करा

ढोरापोरांका दुसऱ्या गावात धाडा ।। ३ ।।

कुत्र्याकोंबडयांकाव सोमतो पोचतो करा

तीन दिवसासाठी परपंच सगळो इसरा ।। ४ ।।

**धडाम !**रामेश्राच्या तोफेचो इशारो झालो

चला धावा गावच्या वेशीकडे बाजीप्रभुंच्या इरांनो ।। ५ ।।

तीन दिवस भुताखेतांची नजरबंदी गावात आसतली

पूर्वजा आपली मिळान सगळी गजाली हय मारतली ।। 6 ।।

किरिस्ताववाडो, काझीवाडो सगळा गाव करा खाली

उगाच विषाची परिक्षा घेवक गावात रवा नको कोणी ।। 7।।

इडा पिडा टळाक होयी, गावात शांती नांदाक होयी

म्हणान गावात दर पाच वर्सानी गावपळण होवकच होयी ।। 8 ।।

यका रामेश्वराच्या आदेशावर सगळा गाव खाली व्हतला

बारा वाडीचा गाव पुन्हा तीन दिवसांनी गजबजतला ।। 9 ।।

अशी ही " गावपळण " आचऱ्या गावाची आगळी यगळी प्रथा

रोजच ओढतास संसाराचो गाडो तीन दिवस आराम करा आता ।। 10 ।।

**कु.अमृता नेताजी पांगे.**

# आठवणीतली गावपळण !

सगळया आचरा पंचक्रोशीत यकच चर्चा चल्ली हा ....

गावपळण आसा मा रे तुम्ही खय जातलास यंदा?

हया वर्साक आम्ही चिंदरात नाय जावचवं? बघु गेलव तर सडेवाडीक जाव ...

मनासारख्या घर भेटणा नाय मा रे ...

तुझा मेल्या बरा आसा दर गावपळणीक सासरवाडचो पाहुणचार झोडपून येतस... तुझी बायल एकुलता याक चेडू आणि तूका काय संसार न्हेवक नको का काय नको... आमचेच वांदे आसत...

तसा सडेवाडचा गोलतकारांचा घर आसा रे! पण पंचाईत अशी झाली हा की दोन तीन महिने झाले आमचो म्हातारो जाग्यार हा ना रे! खाना नाय पिना नाय सगळाच हतरूणात मा रे! तकडे परगावात तेका न्हेवचा तरी कसा? आणि तेची सोय तरी कशी करायची होच येक प्रश्न आसा बगं..!

यकच इटंबना हा. माझी पाच चेडवा, चार–पाच बैल, गायी, वासरा शिवाय सगळा सामान–सूमान सगळो संसार घेवन आमका जावचा लागता भरीस भर म्हणान कि काय यक गाय गाभण आसा. दिवस भरले हत बयेचे. गुढग्या कधी आणि खय जावन इयात तेचो पत्तो लागाचो नाय. सवयच आसा तेका खय तरी आडरानात जावन इयाची. फटकी येवंदेत. त्या रामेश्राकच काळजी आता आमची.

''रे देवा आयतवार म गे आज आणि बाजारपेठ बंद?'' लक्ष्मी गाबतीन पराडकारणीक इचारी व्हती... काय झाला तरी काय ?

अगे ते बापू वारले ना गे काल... सोसायटीचे चेअरमन होते... म्हणान बाजार पेठ बंद ठेवल्यानी आसतली.

काय सांगतस तरी काय... आमका कसा नाय कळाक मग गे... लय चांगलो देव माणूस हां ...कोणी पण गरीबा–सरीबान जावचा नी तेच्या दारार हात पसरायचा.

गे मावले तेनी कधी कोणाक रीत्या हातान पाठवल्यान नाय बग. मुक्या जनावरांकाव कधी दुखवल्यान नाय.

कधी तरी कुर्ले घेयतं माझ्याकडसून. पैशे पण देय नी तेची थोरली सून नारळ बोंडो पण देय. पुढच्या दारार बसान डरकाळी फोडी वाघासारखो... गो तेंका नारळ देवा... तांदूळ देवा... तो आसताना बायल माणसा तर दिसाचीच नाय पुढच्या दारात कोण मग... असो वचक होतो तेचो... यवढया मोठया पंचक्रोशीत याकच घर तेचा १०० माणसांनी भरलेला गोकुळ जसा काय... आजपातूर सगळी एकोप्यान रवतत असा वाटता त्या घराण्याचोच नाय तर गावचोच आधार नायसो झालो.

आमच्या आज्याच्या मरणाची वार्ता आयकान सगळो गाव हळहळलो होतो. तेनी जितेपणी तर कधी कोणाक तरास दिल्यान नाय. आणि मेल्यावरपण नाय.. गावपळणीत आज्याची सोय कशी करायची असो प्रश्न पडलेलो आमका. पण त्या आधीच, तेरा दिवस अगोदर, बापूंनी रामराम म्हटल्यानी. मराण पण बरा इला. गावपळणी दिवशी तेराव्या आणि तेव्हाच मांगरीत दत्तजयंतीचो उत्सव.

तेराव्याचा जेवन सुर्यास्ताआधी संपवचा लागता असा शास्त्र आसा असा थोरली माणसा बोलत व्हती. गावची सगळी माणसा मांगरीत दत्तजयंतीचा जेवान जेवक गेली. त्यामुळे आमचा बराचसा जेवान उरला. आता तेचा काय करायचा? बारा वाजत इलेले. रामेश्राकडे तोफेचो इशारो होवच्या अगोदर गाव सोडुचा होता.. ढोरा–पोरांकाव सोमताच तकडे दुसऱ्या गावात धाडूंचा होता. आमचो बाबा लय काळजेत दिसत होतो.

तेवढयात देव पावलो आणि खयसुन तरी डिगलो न्हावी सांगाक इलो, 'रस्त्यावर काम करणारी लमाणी लोका जातत हत तेंका हया जेवान देवा...जेवनाची नासाडी पण टळात आणि बापूंच्याव आत्म्याक शांती लाभात. नाय तरी तेंका सवयच होती ना दानधर्म करूची.'

झाला. यकदाची जेवनाची नासाडी टळली... यका प्रश्नाचा उत्तर गावता न गावता तवसर भोजारचो गिरी आरडत इलो. 'गे तुमची गाय इयाली हा तकडे आडयात...' तेराव्याच्या गडबडीत आमचो लक्ष नसताना हि अवदसा दाया तोडुन तकडे आडयात पोचली इयाक... काय तरी म्हणायचा बाय! कर्माची इटंबना आसा. सगळीच कशी पिडूक जन्माक इली हत काय म्हायत... आमचो बापूस बडबडत होतो. माझ्या आयशीक मातूर यकच काळजी ही बया आडयात इयाली म्हणजे नक्कीच वार खाल्यान आसतली आता दुध पण नाय आणि खरवस पण नाय!

शेवटी आमच्या बाबान त्या गिरीक आणि पोरांका धाडल्यान तकडे आडयात गायक नि वासराक आणूक. स्वतः बैलांका घेवन सडयावरसुन गेलो. आयस, मी आणि माई रिक्षेतसुन सामान घेवन पुढे गेलव... तकडे त्या पोरांका त्या गायन लाथे मारून हैराण केल्यान. वासराक हातच लावक देय नाय. इंदू आणि गिरीक जाळकटीत भिरकावन दिल्यान नी माझ्या बारक्या भयनीचा थोबाड मस्त सुजवलेल्यान. बिचारी आमची पोरा मोठया मुश्कीलीन कशी–बशी त्या गायक नी वासराक घेवन सडेवाडीक मुक्कामावर पोचली यकदाची आणि आमचो जीव भांडयात पडलो.

येताना वाटेत मस्त गंमती–जमती बगूक मिळाले. याक याक घर हळूहळू खाली व्हयत व्हता. लोका मिळात त्या वाहनात बसान लवकरात लवकर गावची वेस पार करण्याच्या प्रयत्नात व्हती. मधेच कधी कोणाची पोरा हट्टाक येयत तर कधी कोणाची ढोरा. कुणाचा तरी याक पाडक्या असाच हट्टाक पेटलेला. माका वाटता तेका आपला घर सोडून जावचा नाय व्हता तेनी रस्त्यातच थपकन घालून दिल्यान. बिचारी तेची मालकिण मारून मारून दमली तेका पण ता पाडक्या काय जागचा हलाचा नाव घेय नाय. कायच पर्याय नाय म्हटल्यावर मग तीनी त्या पाडक्याक यकाच्या बैलगाडयेक बांधल्यान आणि कशी तरी वडत–फरफटत त्या गायक न्हेल्यान.

आमची सगळयांची वरात सडेवाडीक पोचली. ढोरांकाव चराक मस्त रान भेटला व्हता. भूकेन पोरांच्या पोटात कावळे वरडाक लागले. तशी ती पोरा आयेक जेवक वाढ म्हणान भूणभूण करूक लागली. आयेन जेवान वाढल्यान. दमलेली आमची वासरा पण जेवन टेरेसवर निजाक गेली. त्या आकाशाची चांदण्यानी सजवलेली शाल पांघरून मस्त झोप लागली. न्हावसाठी पहाटे पहाटे आयशीन उठवन घातल्यान म्हणुन तिचो लय राग इलो. पण सांगतव कोणाक झक मारत उठाचाच लागला नायतर पाठीत धपाटे पडले असते.

आमका गोलतकारांचा बेस घर भेटलेला थय आम्ही आमचो वाऱ्यावरचो संसार मांडलेलव. काय काय लोका रानातच झोपडा बांधुन रवलेली. स्लॅपच्या घरात रवणाऱ्या श्रीमंतांच्या पोरांका झोपडेत वावारताना बघताना लय गंम्मत वाटत होती.

आम्ही त्या गावात मस्त रूळलेलवं. शेजारचा याक बारक्या पोरग्या आमच्याकडे खेळाक येय. तेच्या बरोबर  आमची गट्टी जमलेली. आम्ही थय रवाक गेल्या पासून तेनी शाळेत जावचाच टाकलेल्यान. दिवस कसो उगवा नी कसो मावळा काय कळाचाच नाय बग. असे चार दिवस गेले.

त्या दिवशी संकष्टी चतुर्थी होती. आमचो सगळयांचो उपास होतो. आयेन मुगाचा कढाण बनवलेल्यान. तेंची संध्याकाळच्या जेवनाची तयारी चललेली. आणि आमची शेजारच्या गावात चिंदरात जत्रेक जावची तयारी चल्ली व्हती. तायग्या आपणाक फिराक न्हेतला म्हणून बारक्या धनश्री पण खुशीत गाजरा खायत होता बिचारा.

तेवढयात खयसून तरी सतलो काका बोंबलत इलो... ‘चला रे लवकर फटाफट आवरा गाव भरलो.’ आमचो जत्रेक जावचो बेत रद्द झालो. जत्रेक जाव शिवायत आम्ही परत जातलावं म्हटल्यावर बारक्या धनश्रीन रडान धुमाकूळ घातल्यान. तेची कशी–बशी समजूत घालून आम्ही आमचो वाऱ्यावरचो संसार आवरून पुन्हा परतीच्या वाटेकडे लागलंव.

पुन्हा मी, आई आणि माई रिक्षेतसून सामान घेवन पुढे निघालवं आणि बाकी पलटण सडयावरसून चलत. बघतंव तर काय आजूंन गावात कोणच पोचला नाय

व्हता. पुरा गाव सूनसान वाटत होता. दुपारच्या भर उन्हात सुद्धा माणसाविणा असलेला ता माझा गाव लय भयाण वाटत होता. सामान घेवन आम्ही सगळयांच्या आधी गावात पोचलवं खरी. पण पंचाईत अशी झाली कि चावी आमच्या बाबाकडेच रवली.

मग आई माका बोलली 'याक काम कर. शिडी लावतंव. तेच्यारसून माळयेवर चढ नी भूतूर वळयत उतरान पयली लायट लाव. मग पुढचा दार उघड.'

साध्या भितीवरच्या पालीक घाबारणारा मी 3 दिवस बंद आसलेल्या त्या घरात आंधारात पयला पाऊल आपूण टाकायचा या कल्पनेनच माझ्या पोटात भितीन गोळोच उभो रवलो.

शेवटी यका दारार आईक आणि बारयेवर माईक उभ्या केलय, आणि राम–राम बोलत मी शिडयेचे पायरे चढाक सुरवात केलंय. यकदाचा वर पोचलय. नी दारावरची आडणी ढकललय फक्त...

तेवढयात खयसून तरी यका बोक्यान माझ्या आंगावर उडी मारल्यान, तसा मी भूत – भूत करून केकटाक लागलंय. तशी माझी आयस खालसून माका वराडली.... इली हत तुका भुता खावक.

खराच त्या बोक्याक बघून त्या घाबरलेल्या परिस्थितीत पण माका हसाक येवक लागला. सालो आमच्या मांजराक ठेवलेला खाणा खावन माजलेलो आणि आमचा मांजूर खय गायब झालेला कोणाक ठावक?

माळयेवरसून त्या आंधारात वळयत येवन लायट लावीपातूर मी जीव मुठीत धरान होतंय. तीन दिवस घर बंद होता त्यामुळे यक प्रकारचो कुबट वास येयत होतो. लायट लावलंय नी पयली जावन भुतूरसून कडी काढलय आणि त्या दोन म्हातारेंका नी मोकळया हवेक घरात घेतलय तेव्हा माझ्या जीवात जीव इलो.

थोडयाच वेळात आमचो बाबा आणि बाकिची पलटण पण हजर झाली. माझी गम्मत आयकान हसान हसान माझ्या बारक्या बहिणीच्या पोटात दुखाक लागला. माका चिडवण बेजार करून टाकल्यानी मेल्यांनी.

हळूहळू झोपलेला गाव जाग्या होयत होता. जो–तो तीन दिवसात आपापल्या परडयात जमा झालेले नारळ–बोंडे जमा करत होतो. ढोरा–पोरा आपापल्या जाग्यावर इसावली होती.

मी मातूर रात्रीच्या अंधारात हतरूणात पडलेलय. पण काय केल्या माका नीज येयना. मग मीया गावपळणीत केलेले गमती–जमती आठवण यकटाच हसत होतंय. आता पुन्हा 5 वर्षानंतर हि गावपळण व्हतली तेव्हा मी खय आसान देवाक ठावक.

वर्षानुवर्षा गेली पण आमच्या आचऱ्या सारख्या गावानी चालू असलेले हे पुर्वापार आगळीवेगळी प्रथा – परंपरा आजूनव तसेच चालू आसत. विविध जाती धर्माचे लोक हय गुण्यागोविंदान नांदतत. गावपळण, डाळप्सारी, गावचो सार्वजनिक गणेश उत्सव या सारख्या कार्यक्रमात हिन्दू, मराठी, ख्रिश्चन, मुसलमान लोकासुद्धा आपलेपणान सामील होतत. माझ्या गावात असलेली ही शांती, सर्वधर्मसहिष्णूता अशीच रवाक होयी अशी त्या रामेश्राक माझी कळकळीची  इनंती आसा............

**अशे हे आमचे गोकूळासारीखे नांदते गाव**
**वर माझं साजिर विश्वासाचा पाया**
**आणि प्रीतीचाकळस ।।**
**हे ईशा तव चरणी करते मी प्रार्थना,**
**कुणाचीहीं या एकोप्याला ना लागो नजर ।**
**हे बाप्पा सर्वाना सुखात आनंदात ठेव आणि सतत तुझी कृपादुष्टी आम्हावरी राहु दे ।।**
**शिव – गौरीतनया मोरया तवचरणी स्तुतीसुमनांची ही माला मी अर्पिते ।**

**कु. अमृता नेताजी पांगे.**
**आचरा, तालूका – मालवण,**
**जिल्हा– सिंधूदुर्ग.**




## || श्री देव रामेश्वर प्रसन्न ||

### गावपळण

रामेश्राक परसाद लागलो
गावपळणीचो नियेद लागलो
कोण जातला रानावनात
तर कोण जातला सडयावर
कोण जायत सासुरवाडीक
तर कोण जायत मायेराक
सामानाची बांधाबांध बेगीन करा
ढोरापोरांका दुस–या गावात धाडा
कुत्र्याकोंबडयांकाव सोमतो पोचतो करा
तीन दिवसासाठी परपंच सगळो इसरा
धडाम ! रामेश्राच्या तोफेचो इशारो झालो
चला धावा गावच्या वेशीकडे बाजीप्रभुंच्या इरांनो
तीन दिवस भुताखेतांची नजरबंदी गावात आसतली
पूर्वजा आपली मिळान सगळी गजाली हय मारतली
किरिस्ताववाडो, काझीवाडो सगळा गाव करा खाली
उगाच विषाची परिक्षा घेवक गावात रवा नको कोणी
इडा पिडा टळाक होयी, गावात शांती नांदाक होयी
म्हणान गावात दर पाच वर्सानी गावपळण होवकच होयी
यका रामेश्वराच्या आदेशावर सगळा गाव खाली व्हतला
बारा वाडीचा गाव पुन्हा तीन दिवसांनी गजबजतला
अशी ही " गावपळण " आच–या गावाची आगळी यगळी प्रथा
रोजच ओढतीस संसाराचो गाडो तीन दिवस आराम करा आता



अमृता पांगे.


अमृता
अ जरामर होऊनी मी
मृ त्युवरी मात करुनी
ता रकांची घेऊनी गती
ने ईन जीवननौका पैलतीरी
ता रुनी सर्व संकटातूनी
जी वन हे अनमोल दिलेस देवा तूही
पां ग तुझे आता कसे फेडू सांग मी ही
गे ली दु:खे आता आली सुखाची ग्वाही
अमू.

# ई साहित्य प्रतिष्ठान

वाचन हा एक चांगला टाईमपास आहे. त्यात चांगला वेळ जातो. पण वाचन हा केवळ टाईमपास नाही. आणि "वेळ" हा "घालवण्या"साठी नाही. आपण वाचत असतो तेव्हा आपण घडतही असतो. पुस्तकांतले शब्द आपले छिन्नी हतोड्याचे काम चोख बजावत असतात. मनावर संस्कार होत असतात. त्यामुळे वाचन करणारा समाज आणि निव्वळ पोटार्थी समाज यांच्यात फ़रक असतो. दिसतो. जाणवतो.

त्यातूनही शब्द जर मातृभाषेतून असतील तर त्या छिन्नीला धार येते. हातोडी जोमदार होते. आणि मातृभाषा जर मराठीसारखी भरजरी, वैभवशाली आणि धारदार असेल तर मनावर होणारा परिणाम आणि संस्कार अधिकच गडद असतात. म्हणून मराठीत वाचन संस्कृती रुजवायची आहे. वाचनाची आवड जोपासायची आहे. वाचनाची वृत्ती, वाचनाचा छंद फ़ुलवायचा आहे. एकट्यादुकट्या व्यक्तीत नाही. मराठीच्या कोट्यवधी साक्षरांत मराठी वाचनाची गोडी निर्माण करणं आणि त्याचं छंदात रुपांतर करणं हे आमचं ध्येय आहे. आणि त्यासाठी माध्यम आहे इंटरनेट.

एक गोष्ट सत्य आहे. अगदी रुस्तमातला रुस्तम वाचक आपलं पहिलं पुस्तक विकत घेत नाही. कधी भॆट म्हणून, कधी घरात पडलेलं. कधी शेजारून. कधी वाचनालयातून. त्याच्या हातात विनामूल्य पुस्तक पडतं आणि तो वाचतो/वाचते. मग जसजशी गोडी लागत जाईल तसतसं किंमतीची पर्वा न करता पुस्तक मिळवून वाचायला लागतो. पण ही गोडी पेरावी, रुजवावी, जोपासावी लागते. म्हणून आम्ही विनामूल्य पुस्तकं दर आठवड्याला निर्माण करून पाठवत असतो. या अभियानात आम्हाला लेखकांचं खुप पाठबळ आहे. अनेक चांगले चांगले लेखक आपली उत्तम दर्जाची पुस्तकं आम्हाला विनामूल्य उपलब्ध करून देतात. म्हणून तर आम्ही आपल्याला उत्कृष्ट पुस्तकं विनामूल्य देऊ शकतो. विनामूल्य आहे म्हणून काहिही साधंसुधं देत नाही. बाजारात पैसे देऊनही मिळणार नाहीत अशी उत्कृष्ट दर्जेदार भारी पुस्तकं आम्ही विनामूल्य देऊ शकतो ती केवळ आमच्या लेखकांच्या कृपेने.

ई साहित्य प्रतिष्ठान हे व्यासपीठ नवीन मराठी साहित्यिकांसाठी आणि वाचकांसाठी ई पुस्तकांचे दालन घेऊन उभे ठाकले आहे. लाखो वाचकांपर्यंत ही पुस्तके विनामूल्य वितरीत करायला सुरूवात केली आहे. सहा वर्षांपुर्वी स्थापन झालेल्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर आपल्या वाचकांना सुमारे चारशे, दर्जेदार, मराठी ई पुस्तके विनामूल्य दिली आहेत. चारशे नवीन साहित्यिकांना या व्यासपीठावरून सादर केले. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य

लोकप्रिय करण्याची चळवळ हिरिरीने पुढे नेली. कविता, कथा कादंबऱ्या आणि गंभीर विषयांवरची पुस्तके प्रकाशित केली. दोन लाख रसिकांपर्यंत हे दर्जेदार साहित्य विनामूल्य पोचवले. चारशे गुणिले दोन लाख म्हणजे आठ कोटी पुस्तके ई साहित्य प्रतिष्ठान तर्फ़े वितरित झाली असे म्हणता येईल. विनामूल्य. तसे पाहिले तर हे एक भव्य काम सुरू आहे. नव्या प्रतिभा, नवे लेखक, नवीन निर्मिती. मराठीत एक नवा अध्याय लिहिला जात आहे. ही नुसती सुरुवात आहे. लेखकांचं पाठबळ जर असंच मिळत राहिलं तर फ़ार मोठी झेप घ्यायची मनिषा आहे.

आता आम्हाला वाचकांचं पाठबळ हवंय.

प्रिय वाचक. तुमच्या ओळखीतल्या ज्यांना पुस्तकं वाचायला आवडतात त्यांचे ई मेल पत्ते पाठवाच. पण जे साक्षर असून, मराठी असून काहीच वाचत नाहीत, किंवा 'मराठी' वाचत नाहीत अशांचे मेल पत्ते आवर्जून पाठवा. अशा दहा लोकांपैकी एकाला जरी मराठी वाचनाची आवड लावण्यात आपण यशस्वी झालो तरी ते एक पुढचे पाऊल असणार आहे. म्हणून ही कळकळीची विनंती आहे की आपल्या आजूबाजूच्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या. या पत्त्यांचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी पुस्तके पाठवण्यासाठी केला जाईल. त्याचबरोबर दहा किंवा अधिक पत्ते पाठवणाऱ्यांना ई साहित्य प्रतिष्ठानचे VIP सभासद म्हणून नोंदले जाईल. या VIP सदस्यांना प्रत्येक पुस्तक सर्वात आधी पाठवले जाईल. त्याचबरोबर ई साहित्य प्रतिष्ठानच्या सर्व स्कीम्समध्ये सहभागी करून घेतले जाईल.

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान